(**<u>इंग्रजीमध्ये  टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद</u>**)

**[२०२२] १३ एस सी आर ५७**

मेसर्स आर. डी. जैन आणि कंपनी

-विरुद्ध-

कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि  इतर

( दिवाणी अपील क्रमांक १७५/२०२२ )

जुलै २७, २०२२

**(मा. न्यायमूर्ति एम. आर. शाह  आणि मा. न्यायमूर्ति बी. व्ही. नागरथना )**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ -कलम  १३(४), १४ -मुख्य महानगर दंडाधिकारी (सी. एम. एम.) याचा अर्थ आणि त्यात अपर मुख्य महानगर दंडाधिकारी (ए. सी. एम. एम.) यांचा समावेश असेल  -उत्तरवादी (प्रतिभूत धनको) ने अपीलकर्त्याकडून (कर्जदार) देय आणि देणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्यांतर्गत कार्यवाही सुरू केली-कर्जदारांनी सुरक्षा मालमत्तेचा भौतिक ताबा देण्यास नकार दिला -प्रतिभूत धनको ने एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्ज दाखल करून प्रतिभूत मालमत्तेचा भौतिक ताबा घेण्यासाठी सी. एम. एम.(CMM) कडून मदत मागितली-हे प्रकरण वेळोवेळी तहकूब केले गेले- प्रतिभूत धनकोने सी. एम. एम. (CMM) यांना कलम १४(१) च्या दुसऱ्या परंतुकामधे नमूद केल्याप्रमाणे अनिवार्य केलेल्या कालबद्ध पद्धतीने अर्ज निकाली काढण्याचे निर्देश देणारा आदेश देण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली-  सी. एम. एम.(CMM) यांच्याकडे असलेली प्रलंबितता आणि कामाचा मोठा भार लक्षात घेऊन खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले आहे की सी. एम. एम.(CMM) यांच्याप्रमाणे  सर्व न्यायिक अधिकार असलेले  ए. सी. एम. एम.(ACMM) हे मुख्य सी. एम. एम.(CMM) यांच्या सममूल्य मानले जाऊ शकतात – उच्च न्यायालयाने पुढे असे निरीक्षण नोंदवले की सी. एम. एम.(CMM) आणि ए. सी. एम. एम.(ACMM) यांना सामन स्थान आहे आणि एकाला दुसर्यापेक्षा कनिष्ठ किंवा दुय्यम म्हटले जाऊ शकत नाही-

अपील केल्यावर असे निर्णीत केले गेलेः एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ नुसार, सी. एम. एम.(CMM )/डी. एम.(DM ) यांना निर्धारित कालमर्यादेत काम करावे लागते आणि योग्य आदेश द्यावा लागतो.- अशा प्रकारे, सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM ) यांच्या द्वारे अधिकारांचा वापर ही अनुसचिविय कृती आहे -- एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्ज निकाली काढताना न्यायिकवत किंवा विवेकबुद्धी वापरण्याची आवश्यकता नाही-कलम १४ द्वारे सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM) यांना वैयक्तिकरित्या जाऊन प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यास भाग पाडले जात नाही-उच्च न्यायालयाने योग्यरित्या असे निरीक्षण नोंदवले आहे की सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM) यांच्याकडे असलेले अधिकार हे अभिनिर्दिष्ट व्यक्ति म्हणून नियुक्त केलेले नाहीत- सी आर. पी सी (Crpc) अंतर्गत सी. एम. एम. (CMM ) द्वारे वापरले जाऊ शकणारे न्यायिक-अधिकार आणि अधिकार, ए. सी. एम. एम.(ACMM) द्वारे देखील वापरले जाऊ शकतात-अशा प्रकारे, जोपर्यंत सी आर. पी सी (Cr.P.C. अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अधिकारांचा संबंध आहे तोपर्यंत ए. सी. एम. एम. (ACMM) ला सी. एम. एम. (CMM ) च्या समतुल्य म्हटले जाऊ शकते- एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या 'सी. एम. एम.' (CMM) या पदावलीचा अर्थ आणि त्यात ए.सी.एम.एम.(ACMM) याचा समावेश आहे.

**याचिका फेटाळत, न्यायालयाने**

**निर्णय दिला:-१.१ एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. ( SARFAESI) कायद्याच्या योजनेचा विचार करता हे उघड आणि स्पष्ट आहे कि प्रतिभूत मालमत्तांच्या विक्रीची पुष्टी करण्यापूर्वी तसेच विक्रीची पुष्टी झाल्यानंतर प्रतिभूत धनकोद्वारे सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला जाऊ शकतो. सुरक्षित मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल, २००२ च्या नियम ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याद्वारे हे केले जाऊ शकते. [परिच्छेद ८] [७३-सी-डी]**

१.२  तथापि, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI ) कायद्याच्या कलम १४ (१) नुसार प्रतिभूत मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यासाठी, प्रतिभूत धनकोने सी. एम. एम./डी. एम. (CMM/DM) कडे लेखी अर्जाद्वारे सुरक्षित मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्याची आणि पुढील कारवाईसाठी त्याच्याकडे (प्रतिभूत धनकोकडे) पाठवण्याची विनंती करणे बंधनकारक आहे. त्या उद्देशासाठी प्रतिभूत धनकोकडून एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI )कायद्याच्या कलम १४ (१) अंतर्गत लेखी अर्ज मिळाल्यानंतर त्वरित कारवाई करणे हे सी. एम. एम./डी. एम. (CMM /DM ) वर लादलेले वैधानिक दायित्व आहे. असा अर्ज प्राप्त होताच, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ (१) मधील परंतुकेत संदर्भित केल्याप्रमाणे  प्रतिभूत धनकोद्वारे सर्व औपचारिकतेच्या अनुपालनाची पडताळणी केल्यानंतर आणि त्या संदर्भात समाधान झाल्यानंतर, प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यासाठी आणि ती प्रतिभूत धनकोकडे लवकरात लवकर पाठवण्यासाठी सी. एम. एम./डी. एम. (CMM /DM ) कडून आदेश पारित करणे अपेक्षित आहे. एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ द्वारे अनिवार्य केल्याप्रमाणे, सी. एम. एम./डी. एम.(CMM /DM ) यांना निर्धारित कालमर्यादेत काम करावे लागेल आणि अर्जाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीत प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्याच्या उद्देशाने योग्य आदेश पारित करावा लागेल जो  पुढील कालावधीसाठी वाढवता येऊ शकतो परंतु एकूण साठ दिवसांपेक्षा जास्त वाढवता येऊ शकत नाही. अशा प्रकारे, सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM ) यांच्या द्वारे अधिकारांचा वापर ही अनुसचिविय कृती आहे. ते  विलंब करू शकत नाही. वेळेला महत्व आहे. हाच विशेष अधिनियमाचा आशय आहे. एन. के. जी. एस. बी. सहकारी बँक लिमिटेडच्या प्रकरणात या न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आणि निर्णय दिला की, सी. एम. एम./डी. एम. (CMM/DM) यांनी प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेताना उचललेले पाऊल हे एक अनुसचिविय पाऊल आहे. हे सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM) यांनी  स्वतः किंवा त्याच्या/तिच्या अधीनस्थ कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे घेतले जाऊ शकते, ज्यात त्याच्या/तिच्या न्यायालयाचा अधिकारी मानल्या जाणाऱ्या ॲडव्होकेट  कमिशनर यांचा  समावेश आहे. कलम १४ नुसार  सी. एम. एम./डी. एम..

(CMM/DM) ला वैयक्तिकरित्या जाऊन सुरक्षित मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यास भाग पडले जात नाही. अशा प्रकारे, हे न्यायालय पुनरुच्चार करते की एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM) ने उचललेले पाऊल ही एक अनुसचिविय कृती आहे. एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्ज निकाली काढताना न्यायिकवत किंवा विवेकबुद्धी वापरण्याची आवश्यकता नाही. दंडादिकारी यांना अभिनिर्णय करणे आणि अर्जात दिलेल्या माहितीचा खरेपणा ठरवणे एवढेच करायचे आहे आणि त्याहून अधिक काही नाही. त्यामुळे, कलम १४ मध्ये कर्जदाराने प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेणाऱ्या प्रतिभूत धनकोच्या विरोधात मांडलेल्या मुद्यांना अभिनिर्णय कार्यपद्धतीलागू करण्याचा समावेश होत नाही. [परिच्छेद ८.१] [७३ -- डी -एच - ७४-ए -डी]

१.३ सी.आर.पी.सी.(Cr.P.C) च्या कलम ११,१२,१५,१६,१७,१९ आणि ३५ च्या संबंधित तरतुदींवरून असे दिसून येते की कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याची नियुक्ती उच्च न्यायालयाद्वारे मुख्य महानगर दंडाधिकारी म्हणून केली जाऊ शकते. उच्च न्यायालय कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याची अपर मुख्य महानगर दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करू शकते आणि अशा दंडाधिकाऱ्यांना मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांचे सर्व किंवा कोणतेही अधिकार सी.आर.पी.सी. (Cr.P.C) अंतर्गत किंवा उच्च न्यायालय निर्देश देईल त्या तूर्तास अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांतर्गत असतील. मुख्य महानगर दंडाधिकारी आणि प्रत्येक अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे सत्र न्यायाधीशांच्या अधीन असतील आणि प्रत्येक इतर महानगर दंडाधिकारी, सत्र न्यायाधीशांच्या सर्वसाधारण नियंत्रणा खाली, महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असतील. अशा प्रकारे Cr.PC अंतर्गत असलेले न्यायिक अधिकार आणि अधिकार, जे मुख्य महानगर दंडाधिकारी वापरू शकतात, ते अपर मुख्य महानगर दंडाधिकारी देखील वापरू शकतात. अशा प्रकारे, सी.आर.पी.सी. (Cr.PC) अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अधिकारांचा विचार करता, अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या बरोबरीचे असल्याचे म्हटले जाऊ शकते. याव्यतिरिक्त, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना प्रशासकीय अधिकार असू शकतात. तथापि, इतर सर्व कारणांसाठी आणि विशेषतः सी.आर.पी.सी (Cr.PC) अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या

अधिकारांसाठी, न्यायिक अधिकारांच्या वापराबाबत अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

[परिच्छेद १०.१] [७७-बी -ई]

२. वरील चर्चा लक्षात घेता आणि वर नमूद केल्याप्रमाणे, जेव्हा अपर मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी वापरण्याचे अधिकार हे मुख्य महानगर दंडाधिकारी [कलम १७(२) सी.आर.पी.सी. (Cr.P.C)] द्वारे वापरण्याच्या अधिकारांच्या बरोबरीचे असतात आणि मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे सत्र न्यायाधीशांच्या (कलम १९ सी.आर.पी.सी.(Cr.P.C)) अधीन असतात आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी उचललेली पावले, वर नमूद केल्याप्रमाणे, अनुसचिविय स्वरूपाची असतात आणि त्यात कोणत्याही अभिनिर्णय कार्यपद्धतीचा समावेश नसतो आणि कोणत्याही न्यायिकवत कार्याचा कोणताही घटक नसतो, तेव्हा आक्षेपित निकालात मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा दृष्टिकोन बाळगण्याचे आम्हाला कोणतेही कारण दिसत नाही. हे न्यायालय असे मानते की एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या "मुख्य महानगर दंडाधिकारी" या पदावलीचा अर्थ आणि त्यात अपर महानगर दंडाधिकारी यांचा समावेश आहे. . [परिच्छेद १०.२] [७७ -एफ-एच; ७८-ए]

३. त्याचप्रमाणे, जेव्हा अपर जिल्हा दंडाधिकाऱ्यांना एकतर प्रतिनिधीमंडळाद्वारे आणि/किंवा विशेष आदेशांद्वारे जिल्हा दंडाधिकाऱ्यांद्वारे अधिकार प्रदान केले जातात आणि अपर जिल्हा दंडाधिकारी जिल्हा दंडाधिकाऱ्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या अधिकारांचा वापर करत असतात, तेव्हा तीच अनुरूपता लागू केली जाऊ शकते, विशेषतः जेव्हा एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत वापरण्यायोग्य अधिकार हे अनुसचिविय कार्यवाही प्रमाणे असतात. [परिच्छेद १०.३] [७८-बी]

४. हा मुद्दा/प्रश्न दुसऱ्या दृष्टिकोनातूनही विचारात घेतला जाऊ शकतो. हे वादग्रस्त असू शकत नाही आणि सी. एम. एम. (CMMs) आणि/किंवा अगदी डी. एम. (DMs) ना वेगवेगळ्या कायद्यांतर्गत इतर अनेक कर्तव्ये पार पाडणे आवश्यक आहे या वस्तुस्थितीची

न्यायालयीन दखलही घेतली जाऊ शकते. त्यांना अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात. जिल्हा दंडाधिकारी ह्यांचे अधिकारक्षेत्र/जिल्ह्यावर प्रशासकीय नियंत्रण असते. त्याचप्रमाणे, सी. एम. एम. (CMMs) ना प्रशासकीय कर्तव्ये पार पाडणे देखील आवश्यक आहे आणि त्यांना इतर प्रकरणे/फौजदारी प्रकरणे आणि विशेष कायद्यांतर्गत अनेक प्रकरणे देखील हाताळावे लागतात. एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्यांतर्गत प्रकरणे आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत कार्यवाही आणि/किंवा अर्ज वाढत आहेत यात वाद नाही. ०९.०८.२०१७ रोजीचा आक्षेपित निकाल आणि आदेशात उच्च न्यायालयाच्या लक्षात आले की एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत केवळ एका सी. एम. एम. (CMM) कडे ९२६ प्रकरणे प्रलंबित होती. त्यामुळे कलम १४ अंतर्गत अनेक अर्ज प्रलंबित आहेत. एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्यात एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जांचा त्वरित निपटारा करण्याची तरतूद आहे यातही वाद नाही. कलम १४ च्या दुसऱ्या तरतुदीनुसार, सुरक्षित मालमत्ता ताब्यात घेण्याच्या उद्देशाने योग्य आदेश अर्जाच्या तारखेपासून जास्तीत जास्त साठ दिवसांच्या कालावधीत पारित करणे आवश्यक आहे. त्यामुळे, जर अपीलकर्त्यांच्या वतीने, फक्त संबंधित सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM) लाच एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्जांवर निर्णय घेण्याचे अधिकारक्षेत्र असेल, असे निवेदन स्वीकारले गेले, तर अशा परिस्थितीत, संबंधित सी. एम. एम./डी. एम. (CMM/DM)ला एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्जावर त्वरित आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या दुसऱ्या तरतुदीनुसार निर्धारित केलेल्या वेळेच्या आत निर्णय घेणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य होईल. जर, ह्या न्यायालयाने प्रस्तावित केलेले निर्वचन, म्हणजेच, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत, जिल्हा दंडाधिकारी/मुख्य महानगर दंडाधिकारी मध्ये अपर जिल्हा दंडाधिकारी/अपर मुख्य महानगर दंडाधिकारी ह्यांचा समावेश आहे, हे त्यास एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याचे प्रयोजन आणि उद्देश्य साधण्यासाठी चे सहेतुक निर्वचन म्हंटले जाऊ शकते,

**विशेषतः जेव्हा, वर विचार व्यक्त केल्या प्रमाणे एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत जे पारित करावयाचे आदेश हे मुख्यतः प्रतिभूत धनकोला, प्रतिभूत मालमत्तेचा ताबा मिळविण्यासाठी/ प्राप्त करण्यासाठी सहाय्य करण्यासाठीचे प्रशासकीय उपाययोजना आहेत. अशा प्रकारे, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत न्यायिक अधिकारांचा वापर करण्याचा कोणताही घटक नाही. या सर्व पैलूंचा उच्च न्यायालयाने आक्षेपित निकाल आणि आदेशात तपशीलवार विचार केला आहे. [परिच्छेद ११] [७८-सी-एच; ७९-ए-बी]**

**५ . हे न्यायालय उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनाशी पूर्णपणे सहमत आहे की (१) जिल्हा दंडाधिकारी, मुख्य महानगर दंडाधिकारी हे एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या उद्देशाने अभिनिर्दिष्ट व्यक्ति म्हणून नियुक्त केलेले नाहीत; (२) एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या 'जिल्हा दंडाधिकारी' आणि 'मुख्य महानगर दंडाधिकारी' ह्या पदावलींचा अर्थ आणि त्यात अपर जिल्हा दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा समावेश असेल. [परिच्छेद १२] [७९-सी]**

एन. के. जी. एस. बी.(NKGSB) सहकारी बँक लिमिटेड -विरुद्ध- सुबीर चक्रवर्ती आणि इतर. **दिवाणी अपील क्र. १६३७/२०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला** ; हरि चंद अग्रवाल विरुद्ध बटाला अभियांत्रिकी कंपनी लिमिटेड आणि इतर. **[१९६९] २ एस. सी. आर.२०१ -संदर्भित.**

**उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १९७७ च्या फौजदारी संदर्भ क्रमांक ९ मध्ये** महाराष्ट्र राज्य -वि.- शांती प्रसाद जैन मध्ये निर्णय दिला; शिवम वॉटर ट्रीटर्स पी. लिमिटेड वि. अधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया **२०१३ च्या विशेष दिवाणी अर्ज क्रमांक १२६३२ मध्ये गुजरात उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निर्णय दिला-संदर्भित.**

<u>**निर्णयविधी संदर्भ**</u>

**[१९६९] २ एस. सी. आर २०१ संदर्भित परिच्छेद ४.२**

दिवाणी अपील न्यायाधिकरणः दिवाणी अपील क्र. १७५/२०२२

२०१७ च्या रीट याचिका क्रमांक १९६१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या २२.१२.२०१७ रोजीच्या निकाल आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यां तर्फे अधिवक्ता पूर्वीश जितेंद्र मलकन, सुश्री धरिता पी. मलकन,सुश्री दीपा गोरसिया, आलोक कुमार, सुश्री नंदिनी छाब्रा,सुश्री खुशबू विनोदराय मलकन,सुश्री भावना सरकार.

उत्तरवादीं तर्फे अधिवक्ता सचिन पाटील, राहुल चिटनीस, आदित्य ए. पांडे, जिओ जोसेफ, सुश्री श्वेता शेपाल.

**मा. न्यायमूर्ति एम. आर. शाह** द्वारा दिला गेलेला न्यायालयाचा निर्णय खालील प्रमाणे :-

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रिट याचिका क्र १९६१/२०१७ मध्ये पारित केलेल्या दिनांक २२.१२.२०१७ रोजीच्या आक्षेपित निकाल आणि आदेशामुळे व्यथित आणि असमाधानी झाल्याने, कर्जदाराने सध्याचे अपील दाखल केले आहे, ज्याद्वारे, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे "एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय." (“SARFAESI Act”) म्हणून संदर्भित) कायद्याचे - कलम १४ चा अर्थ लावताना असा निर्णय दिला की, (१) जिल्हा दंडाधिकारी, मुख्य महानगर दंडाधिकारी हे एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या उद्देशाने अभिनिर्दिष्ट व्यक्ति म्हणून नियुक्त केलेले नाहीत; (२) एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या 'जिल्हा दंडाधिकारी' आणि 'मुख्य महानगर दंडाधिकारी' ह्या पदावलींचा अर्थ आणि त्यात अपर जिल्हा दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा समावेश असेल.

२. सध्याच्या अपीलामधिल हकीगत थोडक्यात खालीलप्रमाणे आहेतः

२.१ येथे उत्तरवादी क्रमांक १ - वित्तीय संस्था-कॅपिटल फर्स्ट लिमिटेड ही एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम २ (१) (झेड. डी.)(z.d.) नुसार प्रतिभूत धनको (यापुढे 'प्रतिभूत धनको' म्हणून संबोधण्यात येईल) आहे. प्रतिभूत धनकोने यातील अपीलकर्ता-कर्जदारा कडून देय आणि देणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्यांतर्गत कार्यवाही सुरू केली. एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या कार्यवाहीनुसार, प्रतिभूत धनकोने प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेण्याची प्रक्रिया सुरु केली. तथापि, कर्जदारांनी प्रतिभूत मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा देण्यास नकार दिला. प्रतिभूत धनकोने २१.०१.२०१७ रोजी प्रतिभूत मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आणि उक्त प्रतिभूत मालमत्तेवर ताबा असल्याची सूचना चिकटवली. १७.०३.२०१७ रोजी, प्रतिभूत धनकोने एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अन्वये मा. मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालय, एस्प्लानेड, मुंबई येथे अर्ज दाखल केला आणि प्रतिभूत मालमत्तेचा भौतिक ताबा मिळविण्यासाठी मा. मुख्य महानगर दंडाधिकारी यांना मदतीसाठी विनंती केली. हे प्रकरण वेळोवेळी तहकूब करण्यात आले आणि शेवटी ते २९.०७.२०१७ पर्यंत तहकूब करण्यात आले. एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या पोटकलम (१) च्या दुसऱ्या परंतुका नुसार, अर्जाचा निपटारा ३० दिवसांच्या कालावधीत करणे आवश्यक होते आणि कायद्याने अनिवार्य केलेल्या कालावधीत अर्जाचा निर्णय न घेतल्यामुळे, प्रतिभूत धनकोने प्रकरण पुढे ढकलण्यासाठी अर्ज दाखल केला. हा अर्ज नव्याने दाखल करण्यात आल्याने आणि अनेक जुने अर्ज प्रलंबित असल्याच्या कारणावरून हा अर्ज मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी फेटाळला. त्यामुळे, प्रतिभूत धनकोने सध्याच्या रिट याचिकेद्वारे उच्च न्यायालयाकडून मा. मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत त्यांची प्रकरणे/अर्ज कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यासाठी योग्य निर्देश आणि आदेश देण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली.

२.२ उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना प्रलंबित अर्ज शक्य तितक्या लवकर आणि अधिमानतः आदेशासह, रिट प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत निकाली काढण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. मा. मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी दिनांक १४.०८.२०१७ चा पत्रव्यवहार उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला की, जरी, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायदा, २००२ मध्ये उक्त कायद्याच्या कलम १४ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जांचा त्वरित निपटारा करण्याची तरतूद असली, तरी मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लानेड, मुंबई यांच्या न्यायालयात ०९.०८.२०१७ पर्यंत च्या अभिलेखा नुसार या कायद्यांतर्गत ९२४ प्रकरणे प्रलंबित आहेत. ९२४ प्रकरणांपैकी ५०९ प्रकरणे २०१७ साली दाखल झाली आहेत. तथापि, २०१४ सालची २७ प्रकरणे, २०१५ सालची ९६ प्रकरणे आणि २०१६ सालची २९१ प्रकरणे अजूनही निकाली निघण्यासाठी प्रलंबित आहेत. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, जुन्या प्रलंबित खटल्यांचा निपटारा करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे नवीन प्रकरणांपेक्षा प्रलंबित असलेल्या जुन्या प्रकरणांना प्राधान्य दिले जात आहे.

२.३ उपरोक्त अहवाल प्राप्त झाल्यावर, उच्च न्यायालयाचे असे मत झाले की एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जांचे प्रमाण आणि अशा अर्जांची प्रलंबितता लक्षात घेता, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अधिकारी असलेले मुख्य महानगर दंडाधिकारी, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ (१) च्या पहिल्या आणि दुसऱ्या परंतुकानुसार कालबद्ध कालावधीत अशा अर्जांचा निर्णय घेऊ शकत नाहीत. असे मत व्यक्त केल्यानंतर, उच्च न्यायालयाने प्रलंबितता कमी कशी करावी या मुद्द्यावर विचार करण्यास सुरुवात केली. या संदर्भात, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या संबंधित तरतुदी तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७ (२) आणि कलम १९ चा विचार केल्यानंतर, उच्च न्यायालयाने असे प्रतिपादित केले की अपर मुख्य महानगर दंडाधिकारी (थोडक्यात "ए. सी. एम. एम" “ACMM”) यांना मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांचे सर्व न्यायिक अधिकार प्रदान केल्या जात असल्याने, त्यांना मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या समतुल्य मानले जाऊ शकते. उच्च न्यायालयाने असेही मत नोंदवले की जोपर्यंत न्यायिक अधिकारांच्या वापराचा संबंध आहे, मुख्य महानगर

दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी यांना समान स्थान आहे आणि एकाला दुसऱ्या पेक्षा कनिष्ठ किंवा दुय्यम म्हटले जाऊ शकत नाही. पुढे असे ही प्रतिपादित केले गेले आणि आणि सांगितले की मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा दर्जा समान आणि एकच असल्याने, अपर मुख्य महानगर दंडाधिकारी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अधिकारांचा वापर करू शकतात. असा निर्णय देतांना, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने **स्टेट ऑफ महाराष्ट्र -विरुद्ध- शांती प्रसाद जैन** या क्रिमिनल रेफ्रन्स नं ९/ १९७७ मध्ये दिनांक २९.०९.१९७७ रोजी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयांवर बऱ्याच प्रमाणात भर देण्यात आला आहे, ज्याद्वारे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निर्णय दिला आणि असा निष्कर्ष काढला की मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी ही समान दर्जाची न्यायालये आहेत, ज्यांचे फौजदारी प्रकरणांच्या बाबतीत समान किंवा एकच अधिकारक्षेत्र आहे तसेच एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांचे अधिकार पूर्णपणे निष्पादक स्वरूपाचे आहेत आणि न्यायिकवत कार्यांचा कोणताही घटक नसलेले आहेत, ही वस्तुस्थिती विचारात घेऊन शेवटी ते उच्च न्यायालयाद्वारे खालीलप्रमाणे मत नोंदवले गेले आणि प्रतिपादित केले की :-

**“(I) जिल्हा दंडाधिकारी, मुख्य महानगर दंडाधिकारी हे एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या उद्देशाने अभिनिर्दिष्ट व्यक्ति म्हणून नियुक्त केलेले नाहीत.**

**(II) एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या 'जिल्हा दंडाधिकारी' आणि 'मुख्य महानगर दंडाधिकारी' ह्या पदावलींचा अर्थ आणि त्यात अपर जिल्हा दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा समावेश असेल.”**

२.४ उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने पारित केलेल्या आक्षेपित निकाल आणि आदेशामुळे व्यथित आणि असमाधानी झाल्याने, कर्जदाराने सध्याचे अपील दाखल केले

असून, ज्याद्वारे, निर्णीत केल्या गेले की  जिल्हा दंडाधिकारी, मुख्य महानगर दंडाधिकारी हे एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.  (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या उद्देशाने अभिनिर्दिष्ट व्यक्ति  म्हणून नियुक्त केलेले नाहीत आणि  एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी  एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या 'जिल्हा दंडाधिकारी' आणि 'मुख्य महानगर दंडाधिकारी' ह्या पदावलींचा अर्थ आणि त्यात अपर जिल्हा दंडाधिकारी आणि अपर  मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा समावेश असेल.

३.  कर्जदार याचिकाकर्त्याच्या वतीने विद्वान वकील श्री. पूर्विश जितेंद्र मलकन आणि राज्य सरकारच्याच्या वतीने ज्येष्ठ वकील श्री. सचिन पाटील उपस्थित झाले. उत्तरवादी क्रमांक  १-प्रतिभूत धनकोच्या वतीने कोणीही हजर झाले नाही.

४. कर्जदाराच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील श्री. मलकन यांनी ठामपणे म्हणणे सादर केले  की, उच्च न्यायालयाने एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI ) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर अपर  मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर  जिल्हा दंडाधिकारी हे देखील करू शकतात असा निर्णय देऊन गंभीर चूक केली आहे. तसेच त्यांनी असेही ठामपणे मांडले की  उच्च न्यायालयाने जिल्हा दंडाधिकारी आणि मुख्य महानगर दंडाधिकारी यांना  एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४  नुसार अभिनिर्दिष्ट व्यक्ति म्हणून नियुक्त  केले गेले नाही  आणि असा निर्णीय देऊन सुद्धा अतिशय गंभीर/ तीव्र स्वरूपाची चूक केली आहे.

४.१  उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित  निकाल आणि आदेश हा गुजरात उच्च न्यायालय, केरळ उच्च न्यायालय आणि कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या अगदी विरुद्ध आहे, असे कर्जदाराच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील श्री. मलकन यांनी सांगितले आहे.असे सादर करण्यात आले की गुजरात उच्च न्यायालयाने असे निर्णीत केले कीः

"१)  जिल्हा दंडाधिकारी आणि अपर जिल्हा दंडाधिकारी हे दोन भिन्न आणि वेगळे अधिकारी आहेत.

२) कलम १४ अन्वये जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांना प्रदान केलेले अधिकार हे विशेषतः या अधिकाऱ्यांनाच  देण्यात आले आहेत. या अधिकाराचा

वापर करण्याचा एक पैलू म्हणजे जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांना या कलमाच्या आवश्यकतेच्या अनुपालनाची पूर्ती स्वतःला करावी लागते. सदर पूर्ती ही वैयक्तिक पूर्ती आहे . जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांना जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे मुख्य महानगर दंडाधिकारी म्हणून त्यांच्या विशिष्ट क्षमतेनुसार अधिकार प्रदान केले आहे. ते स्वतःच अधिकारांचा वापर करण्यासाठी सक्षम अधिकारी आहेत. कलम १४ अंतर्गत असलेले अधिकारांचे स्वरूप या तरतुदीअंतर्गत अधिकारांच्या वापराचे हस्तांतरण/प्रत्यायोजन वेगवेगळ्या व्यक्तीला किंवा अधिकाऱ्यांना करण्याची परवानगी देत नाही."

४.२ असे निवेदन सादर करण्यात आले की गुजरात उच्च न्यायालयाने वर नमूद केल्याप्रमाणे निर्णय देताना **हरी चंद अग्रवाल -विरुद्ध - बटाला अभियांत्रिकी कंपनी लिमिटेड आणि इतर (१९६९)२ SCR २०१)** प्रकरणात या न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आधार घेतला. तसेच असे निवेदन सादर करण्यात आले की **हरीचंद अग्रवाल** (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, जिल्हा दंडाधिकारी आणि अपर जिल्हा दंडाधिकारी हे वेगळे अधिकारी आहेत आणि अपर जिल्हा दंडाधिकारी हे जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या अधीन आहेत आणि त्यामुळे अपर जिल्हा दंडाधिकारी हे अधीनस्थ असल्याने ते जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारांचा वापर करू शकत नाहीत.

४.३ असे निवेदन सादर करण्यात आले की गुजरात उच्च न्यायालयानेही **शिवम वॉटर ट्रीटर्स पी. लिमिटेड -विरुद्ध- अधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया** विशेष दिवाणी अर्ज १२६३२/२०१३ या प्रकरणात दिनांक १७.०९.२०१३ रोजी पारित केलेल्या त्याच न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयाचा विचार केला आहे आणि त्याचा आधार घेतला आहे, ज्याद्वारे , उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आणि प्रतिपादित केले की:-

"७. सिक्युरिटायझेशन ॲक्ट, कलम १४ अंतर्गत प्रदान केलेले अधिकार मुख्य महानगर दंडाधिकारी, अपर मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना सोपवू शकतात का, या प्रश्नावर विचार करण्याची संधी यापूर्वी याच खंडपीठाला मिळाली होती. त्या संदर्भात, या खंडपीठाने असे प्रतिपादित केले होते की मुख्य महानगर दंडाधिकारी, अहमदाबाद

यांची महानगर दंडाधिकारी अहमदाबाद यांना कार्य वितरण करण्या बाबतची कृती जी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १९ खंड (३)सह फौजदारी नियमावली, १९७७ च्या अध्याय XXXII च्या नियम १० खंड (१) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापरकरून करण्यात आली आणि त्याद्वारे अपर मुख्य महानगर दंडाधिकारी अहमदाबाद यांना अहमदाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत उद्भवणाऱ्या सिक्युरिटायझेशन ॲक्ट कायद्याच्या तरतुदींखालील प्रकरणे स्वीकारण्याचे आणि त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार दिले गेले , ती कृती अधिकार क्षेत्राच्या बाहेरची होती.

८. आमच्यासमोर असलेल्या प्रकरणात, जिल्हा दंडाधिकारी असे अधिकार उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना सोपवू शकतात का असा थोडा वेगळा प्रश्न आहे."

या बाबतीत असे सादर करण्यात आले की त्यानंतर विशेषतः असे म्हंटले आणि ग्राह्य धरण्यात आले की केवळ जिल्हा दंडाधिकारीच एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अधिकारांचा वापर करू शकतात.

४.४ वरील निवेदने सादर करून आणि **हरी चंद अग्रवाल** (उपरोल्लेखित) प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन तसेच गुजरात, केरळ आणि कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आधार घेऊन, अशी विनंती करण्यात येते की हे अपील मान्य करण्यात यावे आणि उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निकाल आणि आदेश रद्द करण्यात यावा आणि केवळ जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांनाच मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी म्हणून त्यांच्या विशिष्ट क्षमतेनुसार एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अधिकार वापरण्याचे अधिकार बहाल केले आहेत असे मानण्यात यावे.

५. राज्य सरकारची बाजू मांडणारे विद्वान वकील सचिन पाटील यांनी उच्च न्यायालयाने दिलेल्या आक्षेपित निर्णयाला आणि आदेशाला पाठिंबा दिला आहे. हे सादर केले जाते की, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४चा महादेश लक्षात घेता, त्यात असे म्हंटले आहे की कलम १४ अंतर्गत आलेल्या अर्जांचा जास्तीत जास्त ६० दिवसांच्या कालावधीत निर्णय घेणे आणि त्यांचा निपटारा करणे हा आहे आणि कामाचे प्रमाण पाहता, जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर

दंडाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या अर्जांकडे पाहता आणि हे लक्षात घेऊन  की त्यांना प्रशासकीय कामासह इतर कर्तव्ये देखील पाहावी लागतात आणि त्यावर विचार करावा लागतो आणि एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्जांचा निर्णय घेताना कालमर्यादा प्रदान करण्याचा अंतिम उद्देश आणि प्रयोजन आहे हे पाहण्याच्या दृष्टीने, सध्याचे अपील फेटाळण्याची विनंती केली जाते.

६. म्हणणे ऐकले. अपर जिल्हा दंडाधिकारी किंवा अपर मुख्य महानगर दंडाधिकारी एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करू शकतात का आणि/किंवा एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये दिसणाऱ्या 'जिल्हा दंडाधिकारी' आणि 'मुख्य महानगर दंडाधिकारी' या संज्ञेचा अर्थ एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या उद्देशाने अपर जिल्हा दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा समावेश केला जाईल की नाही या प्रश्नावर विचार करताना, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत जिल्हा दंडाधिकारी (थोडक्यात 'डी.एम.') आणि मुख्य महानगर दंडाधिकारी (थोडक्यात 'सी.एम.एम.') यांनी वापरण्यायोग्य अधिकारांचा प्रथम विचार करणे आवश्यक आहे. एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याचे कलम १४ खालीलप्रमाणे आहेः-

“१४. मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी प्रतिभूत धनकोला प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्यात मदत करतात.—(१) कोणत्याही प्रतिभूत मालमत्तेचा ताबा प्रतिभूत धनकोने घेणे आवश्यक असल्यास किंवा या कायद्याच्या तरतुदींनुसार प्रतिभूत मालमत्ता विकणे किंवा हस्तांतरित करणे आवश्यक असल्यास, प्रतिभूत धनको, अशा कोणत्याही प्रतिभूत मालमत्तेचा ताबा किंवा नियंत्रण घेण्याच्या उद्देशाने, मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी ज्यांच्या अधिकारितेत अशी कोणतीही प्रतिभूत मालमत्ता किंवा त्याच्याशी संबंधित इतर कागदपत्रे आढळतील किंवा सापडतील, त्यांना ती ताब्यात घेण्याची लेखी विनंती करू शकतो आणि मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थितीनुसार, जिल्हा दंडाधिकारी, अशा विनंतीवर -

(अ) अशी मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेतील; आणि

(ब) अशी मालमत्ता आणि कागदपत्रे प्रतिभूत धनकोकडे पाठवतील

[परंतु, प्रतिभूत धनकोच्या कोणत्याही अर्जासोबत, प्रतिभूत धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने योग्यरित्या पुष्टी केलेले प्रतिज्ञापत्र असेल, ज्यामध्ये असे घोषित केले जाईल की -

(i) मंजूर केलेल्या आर्थिक मदतीची एकूण रक्कम आणि अर्ज दाखल करण्याच्या तारखेला बँकेचा एकूण दावा;

(ii) कर्जदाराने विविध मालमत्तांवर रोखे व्याज निर्माण केले आहे आणि अशा मालमत्तांवर बँक किंवा वित्तीय संस्थेचे वैध आणि विद्यमान व्याज रोखा आहे आणि बँक किंवा वित्तीय संस्थेचा दावा मर्यादेच्या कालावधीत आहे;

(iii) कर्जदाराने वरील उपखंड (ii) मध्ये नमूद केलेल्या मालमत्तांचा तपशील देत विविध मालमत्तांवर रोखे व्याज निर्माण केले आहे;

(iv) कर्जदाराने विनिर्दिष्ट रक्कम एकत्रित करून देण्यात आलेल्या आर्थिक मदतीची परतफेड करण्यात कसूर केली आहे;

(v) आर्थिक मदतीची परतफेड करण्यात अशा प्रकारे कसूर झाल्यास कर्जदाराच्या खात्याचे वर्गीकरण अकार्यक्षम मालमत्ता म्हणून केले गेले आहे;

(vi) कलम १३ च्या उपकलम (२) च्या तरतुदींनुसार कर्जदाराला देण्यात आलेल्या आर्थिक सह्याचा थकीत भरणा करण्याची मागणी करणारी साठ दिवसांची नोटीस बजावली गेली आहेत याची पुष्टी करणे;

(vii) कर्जदाराने मिळालेल्या सूचनेवर जबाब देताना आक्षेप किंवा निवेदन हे प्रतिभूत धनकोने विचारात घेतले आहे आणि असे आक्षेप किंवा निवेदन स्वीकार न करण्याची कारणे कर्जदाराला कळविण्यात आली आहेत;

(viii) वरील सूचना मिळूनही कर्जदाराने आर्थिक मदतीची कोणतीही परतफेड केलेली नाही आणि त्यामुळे अधिकृत अधिकाऱ्याला मूळ कायद्याच्या कलम १४ सह कलम १३ च्या उपकलम (४) च्या तरतुदींनुसार प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्याचा अधिकार आहे;

(ix) या कायद्याच्या तरतुदींचे आणि तदधिन केलेल्या नियमांचे अनुपालन करण्यात आले होतेः

परंतु, पुढे असे आहे की, अधिकृत अधिकाऱ्याकडून प्रतिज्ञापत्र प्राप्त झाल्यानंतर, जिल्हा दंडाधिकारी किंवा यथास्थिती मुख्य महानगर दंडाधिकारी, प्रतिज्ञापत्रातील

मजकुराची पूर्तता केल्यानंतर, प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्याच्या उद्देशाने [अर्जाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत] योग्य आदेश पारित करतील.

[परंतु, मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी आपल्या नियंत्रणाबाहेरच्या कारणांसाठी उक्त तीस दिवसांच्या कालावधीत कोणताही आदेश पारित केला नाही, तर ते त्याची कारणे लेखी अभिलेखनांवर आणल्यानंतर, अशा पुढील कालावधीत आदेश पारित करू शकतील, परंतु हा कालावधी एकूण साठ दिवसांपेक्षा जास्त नसावा.

परंतु, पहिल्या परंतुकात नमूद केलेले प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची आवश्यकता, या कायद्याच्या प्रारंभाच्या तारखेस, कोणत्याही जिल्हा दंडाधिकाऱ्यांसमोर किंवा, यथास्थिती, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांसमोर प्रलंबित असलेल्या कार्यवाहीला लागू होणार नाही.]

(२) उपकलम (१) च्या तरतुदींचे अनुपालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने, मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी उपाययोजना करतील किंवा उपाययोजना करवून घेतील आणि त्यांच्या मते, आवश्यक असेल अशा बळाचा वापर करू शकतील किंवा त्यांचा वापर करवून घेउ शकतील.

(३) या कलमाच्या अनुषंगाने केलेल्या मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी [मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या] कोणत्याही कृतीवर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर आवाहन दिले जाणार नाही."

६.१ २०१३ साली, २०१३ च्या पहिल्या कायद्याद्वारे, कलम १४(१ए) समाविष्ट करण्यात आले आहे, ज्याद्वारे आता, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अधिकारांचा वापर करताना, जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी त्यांच्या अधीनस्थ कोणत्याही अधिकाऱ्याला अशा मालमत्ता आणि त्यांच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यास आणि अशा मालमत्ता आणि कागदपत्रे प्रतिभूत धनकोकडे पाठविण्यास अधिकृत करू शकतात. २०१३ साली समाविष्ट केलेले कलम १४(१ए) खालीलप्रमाणे आहेः-

"[(१ए) जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी त्यांच्या अधीनस्थ कोणत्याही अधिकाऱ्याला अधिकृत करू शकतात,

((i) अशा मालमत्ता आणि त्यांच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेणे; आणि

(ii) अशा मालमत्ता आणि कागदपत्रे प्रतिभूत धनकोकडे पाठवणे.]”

६.२ अगदी अलीकडील निर्णयात या न्यायालयाने म्हंटल्या आणि ग्राह्य धरल्या प्रमाणे **एन.के.जी.एस.बी. सहकारी बँक लिमिटेड - विरुद्ध - सुबीर चक्रवर्ती आणि इतर** (दिवाणी अपील क्र. १६३७/२०२२) ने २५. ०२. २०२२ रोजी निर्णय दिला की, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४(१ए) अंतर्गत सी.एम.एम./डी.एम.(CMM/DM)ला वकिलाची नियुक्ती करून त्याला/तिला प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यास आणि ती प्रतिभूत धनकोकडे पाठविण्यास अधिकृत करणे खुले आहे.

७. आता जो एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत डी.एम.(DM)आणि सी.एम.एम.(CMM) द्वारे वापरण्यायोग्य अधिकारांचा संबंध आहे, तो ज्या उद्देशांसाठी आणि कारणांसाठी एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI)कायदा अधिनियमित करण्यात आला आहे ते खालीलप्रमाणे आहेः-

**“उद्देश व कारणे यांचे विवरण " :**

अर्थव्यवस्थेचा वेगाने विकास करण्याच्या भारताच्या प्रयत्नांमध्ये आर्थिक क्षेत्र हे प्रमुख घटकांपैकी एक आहे. भारतातील बँकिंग क्षेत्र उत्तरोत्तर आंतरराष्ट्रीय विवेकपूर्ण निकषांचे आणि लेखा पद्धतींचे पालन करत असताना, काही क्षेत्रे अशी आहेत ज्यात बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राला जगातील वित्तीय बाजारपेठेतील इतर सहभागींच्या तुलनेत समान संधी उपलब्ध नाही. बँका आणि वित्तीय संस्थांच्या वित्तीय मत्तांचे प्रतिभूतीकरण सुलभ करण्यासाठी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. पुढे, आंतरराष्ट्रीय बँकांप्रमाणे, भारतातील बँका आणि वित्तीय संस्थांना रोखे ताब्यात घेण्याचा आणि विकण्याचा अधिकार नाही. आपल्या सध्याच्या कायदेशीर चौकटीने व्यावसायिक व्यवहारांशी संबंधित बदलत्या व्यावसायिक पद्धती आणि आर्थिक क्षेत्रातील सुधारणांबरोबर बदलल्या नाहीत. यामुळे थकबाकी कर्जाच्या वसुलीचा वेग मंदावला आहे आणि बँका आणि वित्तीय संस्थांच्या अकार्यक्षम मालमत्तांची पातळी वाढत चालली आहे. बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचे परीक्षण करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने स्थापन केलेल्या नरसिंहम समिती I आणि II आणि अंध्यरूजीना समितीने या क्षेत्रांच्या संदर्भात कायदेशीर व्यवस्थेत बदल करण्याची गरज

विचारात घेतली आहे. या समित्यांनी इतर गोष्टींबरोबरच प्रतिभूतीकरणासाठी आणि सक्षमीकरणासाठी बँका आणि वित्तीय संस्थांना न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय रोखे ताब्यात घेण्यासाठी आणि त्यांची विक्री करण्यासाठी चे अधिकार देण्यासाठी नवीन कायदा अधिनियमित करण्याची सूचना केली आहे. या सूचनांवर कारवाई करत, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, २१ जून २००२ रोजी आर्थिक मालमत्तांचे प्रतिभूतीकरण (सिक्युरिटायझेशन) आणि पुनर्रचना आणि व्याज रोखेची अंमलबजावणी आणि त्याच्याशी संबंधित किंवा प्रासंगिक बाबींचे नियमन करण्यासाठी जारी करण्यात आला. अध्यादेशाच्या तरतुदींमुळे बँका आणि वित्तीय संस्थांना दीर्घकालीन मालमत्तेची वसुली करणे, तरलतेची समस्या हाताळणे, मालमत्ता दायित्व विसंगती आणि रोखे ताब्यात घेण्याच्या, त्यांची विक्री करण्याच्या अधिकारांचा वापर करून वसुली वाढवणे आणि वसुली किंवा पुनर्बांधणीसाठी उपाययोजनांचा अवलंब करून अकार्यक्षम मालमत्ता कमी करणे शक्य होईल."

अशा प्रकारे, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याचा मूळ उद्देश भारतातील वित्तीय संस्थांना, त्यांच्या समकक्षांना, म्हणजे इतर देशांतील आंतरराष्ट्रीय बँकांना मिळणाऱ्या, अधिकारांसारखेच अधिकार देणे हा आहे. वित्तीय संस्थांना रोखे ताब्यात घेण्याचे आणि त्यांची विक्री करण्याचे अधिकार देणे हे असेच एक वैशिष्ट्य आहे. त्याचीच परिणीती एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या तिसऱ्या प्रकरणांतर्गत येणाऱ्या तरतुदींमध्ये झाली आहे. कलम १३ व्याज रोखाच्या अंमलबजावणीशी संबंधित आहे. त्याच्या उपकलम (४) मध्ये अशी संकल्पना मांडण्यात आली आहे की कर्जदाराने उपकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत आपले दायित्व पूर्णपणे पार पाडण्यात चूक केल्यास, प्रतिभूत धनको हा उपकलम (४) मध्ये प्रदान केलेल्या उपायांपैकी एक किंवा अधिक उपायांचा अवलंब करू शकतो. कर्जदाराच्या प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेणे हा एक उपाय आहे, ज्यामध्ये प्रतिभूत मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे. ते, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल, २००२ च्या नियम २ (अ) मध्ये परिभाषित केल्यानुसार ते त्यांच्या "अधिकृत अधिकाऱ्याच्या" माध्यमातून करू शकतात.

७.१ प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेतल्यानंतर, ती भाड्याने देण्यासाठी, अभिहस्तांकित करण्यासाठी किंवा विकण्यासाठी पुढील पावले देखील प्रतिभूत धनको उचलू शकतो. तथापि, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI)कायद्याच्या कलम १४ मध्ये असे म्हंटले आहे की जर प्रतिभूत धनकोला प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घ्यायचा असेल तर त्याने लेखी अर्जाद्वारे सी. एम. एम./डी. एम. कडे जाणे आवश्यक आहे आणि अशी विनंती मिळाल्यावर सी. एम. एम./डी. एम. ने योग्य प्रकारे कारवाई करणे आवश्यक आहे. त्यावर आदेश दिल्यानंतर, त्याने/तिने (सी. एम. एम./डी. एम.) एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. कायद्याच्या कलम १४ (२) सह कलम १४ (१) प्रमाणे प्रतिभूत धनकोकडे पाठविण्यासाठी प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्याचे पुढचे पाउल उचलणे आवश्यक आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे, कलम १४ (२) ही एक सक्षम करणारी तरतूद आहे आणि सी. एम. एम./डी. एम. ला, त्यांच्या मते, आवश्यक वाटतील अशी पावले उचलण्याची आणि बळाचा वापर करण्याची परवानगी देते.

७.२ या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की उप-कलम (१ए) समाविष्ट करण्याबरोबरच, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. कायद्याच्या कलम १४ च्या उप-कलम (१) मध्ये एक परंतुक देखील समाविष्ट करण्यात आला आहे, ज्याद्वारे प्रतिभूत धनकोला आता काही अटींचे पालन करणे आवश्यक आहे आणि त्या संदर्भात त्याच्या अधिकृत अधिकाऱ्याने योग्यरित्या पुष्टी केलेल्या प्रतिज्ञापत्रासह अर्जाच्या माध्यमातून ते उघड करणे आवश्यक आहे. उप-कलम (१ए) हे स्पष्टीकरणात्मक स्वरूपाची तरतुद आहे आणि ते केवळ सीएमएम/डीएमच्या त्याच्या अधीनस्थ कोणत्याही अधिकाऱ्याची सेवा घेण्याच्या अंतर्निहित अधिकाराची पुनरावृत्ती करते. या न्यायालयाने **एन.के.जी.एस.बी. सहकारी बँक लिमिटेड** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात म्हंटल्या प्रमाणे, उपकलम (१ए) समाविष्ट करणे म्हणजे सी.एम.एम./डी.एम. मध्ये प्रथमच नवीन अधिकार देणे असे नाही.

८. अशा प्रकारे, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. कायद्याच्या योजनेचा विचार करता, हे उघड आणि स्पष्ट आहे की प्रतिभूत मालमत्तांच्या विक्रीची पुष्टी होण्यापूर्वी तसेच विक्रीची पुष्टी झाल्यानंतर प्रतिभूत धनकोद्वारे प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेतला जाऊ शकतो. प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल,

२००२ च्या नियम ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बँकेच्या "अधिकृत अधिकाऱ्याद्वारे" केले जाऊ शकते.

८.१ तथापि, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. कायद्याच्या कलम १४ (१) नुसार प्रतिभूत मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यासाठी, प्रतिभूत धनकोने सी. एम. एम./डी. एम. कडे लेखी अर्जाद्वारे संपर्क साधून प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्याची आणि पुढील कारवाईसाठी त्याच्याकडे (प्रतिभूत धनकोकडे) पाठवण्याची विनंती करणे बंधनकारक आहे. त्या उद्देशासाठी प्रतिभूत धनकोकडून एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ (१) अंतर्गत लेखी अर्ज मिळाल्यानंतर त्वरित कारवाई करणे हे सी. एम. एम./डी. एम. चे वैधानिक दायित्व आहे. असा अर्ज प्राप्त होताच, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ (१) मधील तरतुदीत संदर्भित प्रतिभूत धनकोद्वारे सर्व औपचारिकतेच्या अनुपालनाची पडताळणी केल्यानंतर आणि त्या संदर्भात समाधान झाल्यानंतर, प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यासाठी आणि ती प्रतिभूत धनकोकडे लवकरात लवकर पाठवण्यासाठी सी. एम. एम./डी. एम. ने आदेश पारित करणे अपेक्षित आहे. एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ द्वारे अनिवार्य केल्याप्रमाणे, सी. एम. एम./डी. एम. ला निर्धारित कालमर्यादेत काम करावे आणि अर्जाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीत प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्याच्या उद्देशाने योग्य आदेश पारित करावा लागेल जो अशा पुढील कालावधीसाठी वाढवता येऊ शकतो परंतु एकूण साठ दिवसांपेक्षा जास्त नाही. अशा प्रकारे, सी.एम.एम./डी. एम. द्वारे वापरण्यात येणारे अधिकार हा अनुसचिविय कृत्य आहे. तो विलंब सहन करू शकत नाही. वेळेचे महत्त्व आहे. विशेष अधिनियमाची ही आत्मा आहे. पाहिल्याप्रमाणे आणि **एन. के. जी. एस. बी. सहकारी बँक लिमिटेडच्या** प्रकरणात (उपरोल्लेखित) या न्यायालयाने म्हंटल्याप्रमाणे, सी. एम. एम./डी. एम. यांनी प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेताना उचललेले पाऊल हे एक अनुसचिविय पाऊल आहे. हे सी.एम.एम./डी.एम. स्वतः किंवा त्याच्या/तिच्या अधीनस्थ कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे घेतले जाऊ शकते, ज्यात त्याच्या/तिच्या न्यायालयाचा अधिकारी मानल्या जाणाऱ्या वकील आयुक्ताचा समावेश आहे. कलम १४

सी.एम.एम./डी.एम. ला वैयक्तिकरित्या जाऊन प्रतिभूत मालमत्ता आणि त्याच्याशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेण्यास भाग पाडत नाही. अशा प्रकारे, आम्ही पुन्हा सांगतो की एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत सी. एम. एम./डी. एम. ने उचललेले पाऊल हे एक अनुसचिविय पाऊल आहे. एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्ज निकाली काढताना, न्यायिकवत कार्य किंवा विवेकबुद्धीच्या वापराच्या कोणत्याही घटकाची आवश्यकता नाही. दंडाधिकाऱ्यांनी अभिनिर्णय करावा आणि अर्जात दिलेल्या माहितीचा अचूकपणा ठरवावा आणि त्याहून अधिक काही नाही. त्यामुळे, कलम १४ मध्ये कर्जदाराने प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेणाऱ्या प्रतिभूत धनकोच्या विरोधात मांडलेले मुद्दे न्यायनिवाड्याच्या प्रसंभाविक प्रक्रियेत समाविष्ट होत नाहीत.

९. अशा प्रकारे, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याची योजना, विशेषतः, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याचे कलम १४ आणि विद्वान मुख्य महानगर दंडाधिकारी/विद्वान जिल्हा दंडाधिकारी यांच्याद्वारे वापरल्या जाणाऱ्या अधिकारांचे स्वरूप लक्षात घेता, उच्च न्यायालयाने आक्षेपित निकालात आणि आदेशात योग्य निरीक्षण करून असे म्हटले आहे की, विद्वान मुख्य महानगर दंडाधिकारी/विद्वान जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे निहित असलेले अधिकार हे अभिनिर्दिष्ट व्यक्ति स्वरूपात नाहीत.

१०. आता या न्यायालयाच्या विचाराधीन असलेला पुढचा प्रश्न असा आहे की, अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी हे मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असल्याचे म्हटले जाऊ शकते का? त्या उद्देशासाठी ११,१२,१५,१६,१७,१९आणि ३५ या कलमांच्या संबंधित तरतुदींचा संदर्भ देणे आवश्यक आहे, ज्या खाली दिल्याप्रमाणे काढल्या आहेतः-

"११. न्याय दंडाधिकाऱ्यांची न्यायालये.—(१) प्रत्येक जिल्ह्यात (महानगर क्षेत्र नसलेल्या) राज्य सरकार उच्च न्यायालयाशी सल्लामसलत केल्यानंतर अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करून अशा ठिकाणी, प्रथम वर्ग आणि द्वितीय वर्गाच्या न्याय दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांची स्थापना केली जाईल १ [परंतु, उच्च न्यायालयाशी सल्लामसलत केल्यानंतर, राज्य शासनाला, कोणत्याही विशिष्ट प्रकरणांची किंवा विशिष्ट वर्गातील प्रकरणांची संपरीक्षा करण्यासाठी कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी, प्रथम वर्ग किंवा

द्वितीय वर्गाच्या न्याय दंडाधिकाऱ्यांची एक किंवा अधिक विशेष न्यायालये स्थापन करता येतील आणि असे कोणतेही विशेष न्यायालय स्थापन केले गेले असेल त्या बाबतीत, न्याय दंडाधिकाऱ्याचे असे विशेष न्यायालय ज्याच्या संपरीक्षेसाठी स्थापन करण्यात आलेले असेल असा कोणत्याही खटला किंवा अशा वर्गातील खटले यांची संपरीक्षा करण्यास त्या स्थानिक क्षेत्रातील इतर कोणत्याही दंडाधिकारी न्यायालयाला अधिकारीता असणार नाही.] (२) अशा न्यायालयांच्या पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती उच्च न्यायालयाद्वारे करण्यात येईल. (३) उच्च न्यायालयाला जेव्हा ते समयोचीत किंवा आवश्यक वाटेल तेव्हा, ते दिवाणी न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करणाऱ्या राज्याच्या न्यायिक सेवेतील कोणत्याही सदस्याला प्रथम वर्ग किंवा द्वितीय वर्गाच्या न्याय दंडाधिकाऱ्याचे अधिकार प्रदान करू शकतात.

१२. मुख्य न्याय दंडाधिकारी आणि अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी इ.—(१) (महानगर क्षेत्र नसलेल्या) प्रत्येक जिल्ह्यात उच्च न्यायालय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याची मुख्य न्याय दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करेल.(२) उच्च न्यायालय कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याची अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करू शकते आणि अशा दंडाधिकाऱ्यांना या संहितेअंतर्गत किंवा उच्च न्यायालय निर्देश देईल त्या तूर्तास अंमलात असलेला इतर कोणत्याही कायद्यांतर्गत मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार असतील. (३) (अ) उच्च न्यायालय कोणत्याही उपविभागातील कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याला उपविभागीय न्याय दंडाधिकारी म्हणून नियुक्त करू शकते आणि प्रसंगी आवश्यकतेनुसार या कलमात निर्दिष्ट केलेल्या जबाबदाऱ्यांमधून त्याला मुक्त करू शकते. (ब) मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधीन राहून, प्रत्येक उपविभागीय न्याय दंडाधिकारीला उपविभागातील न्याय दंडाधिकाऱ्यांच्या (अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांव्यतिरिक्त) कामाचे पर्यवेक्षण आणि नियंत्रणाचे असे अधिकार असतील जे उच्च न्यायालय या संदर्भात सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करेल.

१५. न्याय दंडाधिकाऱ्यांची अधीनता.—(१) प्रत्येक मुख्य न्याय दंडाधिकारी सत्र न्यायाधीशाच्या अधीन असेल आणि प्रत्येक अन्य न्याय दंडाधिकारी, सत्र न्यायाधीशाच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधिन राहून मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याच्या अधीन असेल.

(२) मुख्य न्याय दंडाधिकारी, वेळोवेळी, त्याच्या अधीनस्थ न्याय दंडाधिकाऱ्यांमध्ये कामकाज वाटून देण्याबाबत या संहितेशी सुसंगत नियम बनवू शकतात किंवा विशेष आदेश देऊ शकतात.

१६. महानगर दंडाधिकाऱ्यांची न्यायालये.—(१) प्रत्येक महानगर क्षेत्रात, उच्च न्यायालयाशी सल्लामसलत केल्यानंतर राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील तितकी आणि तश्या ठिकाणी महानगर दंडाधिकाऱ्यांची न्यायालये स्थापन केली जातील.

(२) अशा न्यायालयांच्या पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती उच्च न्यायालयाद्वारे केली जाईल. (३) प्रत्येक महानगर दंडाधिकाऱ्याची अधिकारीता आणि अधिकारांचा विस्तार संपूर्ण महानगर क्षेत्रात सर्वत्र असेल.

१७. मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी.—(१) उच्च न्यायालय, आपल्या स्थानिक अधिकारितेतील प्रत्येक महानगर क्षेत्राच्या संबंधात एका महानगर दंडाधिकाऱ्याला अशा महानगर क्षेत्रासाठीचा "मुख्य महानगर दंडाधिकारी" म्हणून नियुक्ती करेल. (२) उच्च न्यायालयाला कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याची अपर मुख्य महानगर दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि अशा दंडाधिकाऱ्यांना उच्च न्यायालय निर्देश देईल त्याप्रमाणे या संहितेअंतर्गत किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांतर्गत मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याला सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार असतील.

१९. महानगर दंडाधिकाऱ्यांची अधीनता.—(१) मुख्य महानगर दंडाधिकारी आणि प्रत्येक अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे सत्र न्यायाधीशांच्या अधीन असतील आणि अन्य प्रत्येक महानगर दंडाधिकारी सत्र न्यायाधीशांच्या सर्वसाधारण अधिन राहून मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असतील. (२) अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हा मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असल्यास उच्च न्यायालय, या संहितेच्या प्रयोजनाकरिता, त्या अधीनतेची व्याप्ती, काही असल्यास, निश्चित करू शकेल . (३) मुख्य महानगर दंडाधिकारी, महानगर दंडाधिकाऱ्यांमध्ये कामकाज नेमून देणे याबाबत वेळोवेळी ह्या संहितेशी सुसंगत असे नियम करू शकतात किंवा विशेष आदेश देऊ शकतात.

३५. न्यायाधीश आणि दंडाधिकाऱ्यांचे अधिकार जे त्यांच्या कार्यालयातील उत्तराधिकाऱ्यांद्वारे वापरले जाऊ शकतात —(१) या संहितेच्या अन्य उपबंधांच्या अधिनतेने, न्यायाधीश किंवा दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारांचा आणि कर्तव्यांचा वापर किंवा अंमलबजावणी त्याचा पदीय उत्तराधिकारी करू शकतो. (२) कोणत्याही अपर किंवा सहाय्यक सत्र न्यायाधीशाचा पदीय उत्तराधिकारी कोण असेल याबद्दल काही शंका असल्यास, कोणताही न्यायाधीश या संहितेच्या किंवा त्याखालील कोणत्याही कार्यवाहीच्या किंवा आदेशाच्या प्रयोजनार्थ अशा अपर किंवा सहाय्यक सत्र न्यायाधीशाचा पदीय उत्तराधिकारी म्हणून मानला जाईल ते सत्र न्यायाधीश लेखी आदेशाद्वारे ठरवतील. (३) कोणत्याही दंडाधिकाऱ्याचा पदीय उत्तराधिकारी कोण असेल याबद्दल काही शंका असल्यास, कोणताही दंडाधिकारी या संहितेच्या किंवा त्याखालील कोणत्याही कार्यवाहीच्या किंवा आदेशाच्या प्रयोजनार्थ अशा अपर किंवा सहाय्यक सत्र दंडाधिकाऱ्याचा पदीय उत्तराधिकारी म्हणून मानला जाईल ते मुख्य दंडाधिकारी किंवा प्रकरण परत्वे जिल्हा दंडाधिकारी लेखी आदेशाद्वारे ठरवतील ."

१०.१ वरील तरतुदींवरून असे दिसून येते की कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याची नियुक्ती उच्च न्यायालयाद्वारे मुख्य महानगर दंडाधिकारी म्हणून केली जाऊ शकते. उच्च न्यायालय कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याची अपर मुख्य महानगर दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करू शकते आणि अशा दंडाधिकाऱ्यांना मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांचे सर्व किंवा कोणतेही अधिकार सी.आर.पी.सी. (Cr.P.C) अंतर्गत किंवा उच्च न्यायालय निर्देश देईल त्या तूर्तास अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांतर्गत असतील. मुख्य महानगर दंडाधिकारी आणि प्रत्येक अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे सत्र न्यायाधीशांच्या अधीन असतील आणि प्रत्येक इतर महानगर दंडाधिकारी, सत्र न्यायाधीशांच्या सर्वसाधारण नियंत्रणा खाली, महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असतील. अशा प्रकारे सी.आर.पी.सी. (Cr.P.C) अंतर्गत असलेले न्यायिक अधिकार आणि अधिकार, जे मुख्य महानगर दंडाधिकारी वापरू शकतात, ते अपर मुख्य महानगर दंडाधिकारी देखील वापरू शकतात. अशा प्रकारे, सी.आर.पी.सी. (Cr.P.C) अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अधिकारांचा विचार करता, अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या बरोबरीचे असल्याचे म्हटले जाऊ शकते. याव्यतिरिक्त, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना प्रशासकीय अधिकार असू शकतात. तथापि,

इतर सर्व कारणांसाठी आणि विशेषतः सी.आर.पी.सी (Cr.P.C) अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अधिकारांसाठी, न्यायिक अधिकारांच्या वापराबाबत अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी हे मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या अधीन असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

१०.२. वरील चर्चा लक्षात घेता आणि वर नमूद केल्याप्रमाणे, जेव्हा अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी वापरण्याचे अधिकार हे मुख्य महानगर दंडाधिकारी [कलम १७(२)सी.आर.पी.सी.(Cr.P.C)] द्वारे वापरण्याच्या अधिकारांच्या बरोबरीचे असतात आणि मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर मुख्य महानगर दंडाधिकारी हे सत्र न्यायाधीशांच्या (कलम १९ सी.आर.पी.सी.(Cr.PC)) अधीन असतात आणि एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी उचललेली पावले, वर नमूद केल्याप्रमाणे, अनुसचिविय स्वरूपाची असतात आणि त्यात कोणत्याही अभिनिर्णय कार्यपद्धतीचा समावेश नसतो आणि कोणत्याही न्यायिकवत कार्याचा कोणताही घटक नसतो, तेव्हा आक्षेपित निकालात मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा दृष्टिकोन बाळगण्याचे आम्हाला कोणतेही कारण दिसत नाही. हे न्यायालय असे मानते की एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या "मुख्य महानगर दंडाधिकारी" या पदावलीचा अर्थ आणि त्यात अतिरिक्त महानगर दंडाधिकारी यांचा समावेश आहे.

१०.३. त्याचप्रमाणे, जेव्हा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांना एकतर प्रतिनिधीमंडळाद्वारे आणि/किंवा विशेष आदेशांद्वारे जिल्हा दंडाधिकाऱ्यांद्वारे वापरण्याचे अधिकार प्रदान केले जातात आणि अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी जिल्हा दंडाधिकाऱ्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या अधिकारांचा वापर करत असतात, तेव्हा तीच अनुरूपता लागू केली जाऊ शकते, विशेषतः जेव्हा एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत वापरण्यायोग्य अधिकार हे प्रशाकीय कार्यवाही प्रमाणे असतात.

११. हा मुद्दा/प्रश्न दुसऱ्या दृष्टिकोनातूनही विचारात घेतला जाऊ शकतो. हे वादग्रस्त असू शकत नाही आणि सी.एम.एम.(CMMs) आणि/ किंवा अगदी डी. एम. (DMs) ना वेगवेगळ्या कायद्यांतर्गत इतर अनेक कर्तव्ये पार पाडणे आवश्यक आहे या वस्तुस्थितीची

न्यायालयीन दखलही घेतली जाऊ शकते. त्यांना अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात. जिल्हा दंडाधिकारी ह्यांचे अधिकारक्षेत्र/जिल्ह्यावर प्रशासकीय नियंत्रण असते. त्याचप्रमाणे, सी.एम.एम. (CMMs) ना प्रशासकीय कर्तव्ये पार पाडणे देखील आवश्यक आहे आणि त्यांना इतर प्रकरणे/फौजदारी प्रकरणे आणि विशेष कायद्यांतर्गत अनेक प्रकरणे देखील हाताळावे लागतात. एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्यांतर्गत प्रकरणे आणि एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत कार्यवाही आणि/किंवा अर्ज वाढत आहेत यात वाद नाही. ०९.०८.२०१७ रोजीचा आक्षेपित निकाल आणि आदेशात उच्च न्यायालयाच्या लक्षात आले की एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत केवळ एका सी.एम.एम.(CMM) कडे ९२६ प्रकरणे प्रलंबित होती. त्यामुळे कलम १४ अंतर्गत अनेक अर्ज प्रलंबित आहेत. एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्यात एस.ए.आर.एफ.ए.ई. एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जांचा त्वरित निपटारा करण्याची तरतूद आहे यातही वाद नाही. कलम १४ च्या दुसऱ्या तरतुदीनुसार, प्रतिभूत मालमत्ता ताब्यात घेण्याच्या उद्देशाने योग्य आदेश अर्जाच्या तारखेपासून जास्तीत जास्त साठ दिवसांच्या कालावधीत पारित करणे आवश्यक आहे. त्यामुळे, जर अपीलकर्त्यांच्या वतीने, फक्त संबंधित सी. एम. एम./डी. एम.(CMM/DM) लाच एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्जांवर निर्णय घेण्याचे अधिकारक्षेत्र असेल, असे निवेदन स्वीकारले गेले, तर अशा परिस्थितीत, संबंधित सी.एम.एम./डी.एम. (CMM/DM)ला एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI)कायद्याच्या कलम १४ अंतर्गत अर्जावर त्वरित आणि एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या दुसऱ्या तरतुदीनुसार निर्धारित केलेल्या वेळेच्या आत निर्णय घेणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य होईल. जर, आम्ही प्रस्तावित केलेले निर्वचन, म्हणजेच, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत, जिल्हा दंडाधिकारी / मुख्य महानगर दंडाधिकारी मध्ये अपर जिल्हा दंडाधिकारी/अपर मुख्य महानगर दंडाधिकारी ह्यांचा समावेश आहे, तर, त्यास एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याचे प्रयोजन आणि उद्देश्य साधण्यासाठीचे सहेतुक निर्वचन म्हंटले जाऊ शकते, विशेषतः जेव्हा, वर विचार

व्यक्त केल्या प्रमाणे, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत जे पारित करावयाचे आदेश हे  मुख्यतः प्रतिभूत धनकोला, प्रतिभूत मालमत्तेचा ताबा मिळविण्यासाठी/ प्राप्त करण्यासाठी सहाय्य करण्यासाठीचे अनुसचिविय उपाययोजना आहेत. अशा प्रकारे, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ अंतर्गत न्यायिक अधिकारांचा वापर करण्याचा कोणताही घटक नाही. या सर्व पैलूंचा उच्च न्यायालयाने आक्षेपित  निकाल आणि आदेशात तपशीलवार विचार केला आहे.

१२. आम्ही  उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनाशी पूर्णपणे सहमत आहे की (१) जिल्हा दंडाधिकारी, मुख्य महानगर दंडाधिकारी हे एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या उद्देशाने अभिनिर्दिष्ट व्यक्ति  म्हणून नियुक्त केलेले नाहीत; (२) एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ च्या प्रयोजनासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय.(SARFAESI) कायद्याच्या कलम १४ मध्ये नमूद असलेल्या   'जिल्हा दंडाधिकारी' आणि 'मुख्य महानगर दंडाधिकारी' ह्या पदावलींचा अर्थ आणि त्यात अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी आणि अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांचा समावेश असेल.

१३. इतर उच्च न्यायालयांनी, म्हणजे गुजरात उच्च न्यायालयाने, विशेष दिवाणी अर्ज क्र. १९१०२/२०१५ - पुष्पादेवी बी. जैन  जौ. भवरलाल एम.जैन –  विरुद्ध – इंडियन ओव्हरसीज बँक मध्ये; कलकत्ता उच्च न्यायालयाने एम.ए.क्र. २६/२०१४ श्री. चेल्लापेरुमल आणि  अन्य – विरुद्ध – अधिकृत अधिकारी आणि इतर यांच्या प्रकरणात, केरळ उच्च न्यायालयाने रिट याचिका (फौ.) क्र. ३३१/२००७ असीना  -विरुद्ध - उपविभागीय दंडाधिकारी आणि इतर या प्रकरणामध्ये जो याउलट दृष्टिकोन मांडला आहे जो चांगला कायदा नाही आणि तो विशेषतः रद्द केला जातो.

१४. वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, हे अपील अयशस्वी  ठरते आणि ते फेटाळले जाण्यास योग्य आहे आणि त्यानुसार फेटाळले जाते. आमचे असे मत आहे की, एस.ए.आर.एफ.ए.ई.एस.आय. (SARFAESI) कायद्याच्या कलम १४ नुसार अधिकारिता असलेल्या संबंधित अपर मुख्य महानगर दंडाधिकारी आणि अपर  जिल्हा दंडाधिकारी देखील वापरू शकतात, जे अन्यथा संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या बरोबरीने अधिकारांचा वापर, करीत असून प्रत्यायोजना आणि/किंवा

विशेष आदेशाद्वारे करीत आहेत. त्यानुसार ही याचिका फेटाळण्यात आली. खर्चा बाबत आदेश नाही .

याचिका फेटाळण्यात आली.

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."